**Publication:** Sakal Marathi
**Date:** August 5, 2011

## 'ॲम्बिकल कॉर्ड'दिन १५ ऑगस्टला

पुणे, ता. ४ : रिग्रॉव्हतर्फे १५ ऑगस्ट हा गर्भनाळ बँक दिन (ॲम्बिकल कॉर्ड) म्हणून जाहीर करण्यात आला आहे. यामुळे भविष्यात होणाऱ्या असाध्य आजारांवर नियंत्रण मिळविणे शक्य होईल. गर्भनाळेत मूळपेशी असतात, हे संशोधनातून सिद्ध झाले आहे. या मूळपेशींमध्ये ७५ टक्के गंभीर रोग बरे होण्याची शक्यता असते. भविष्यात उद्भवणाऱ्या गंभीर आजारांवर उपचारासाठीही याची मदत होते. त्यासाठी प्रसूतीनंतर गर्भनाळेतील रक्त बँकेत साठविता येते. त्यासाठी जन्मानंतर दहा मिनिटांच्या आत नाळेतील रक्ताचे जतन केले पाहिजे. बेबी सेल ही रिजनरेटिव मेडिकल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडतर्फे चालविण्यात येते.